# जाहिरात क्रमांक 1/2015
## जिल्हा निवड समिती परभणी.

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्र.एपीटी-2014/प्र.क्र.139/आस्था-8 दिनांक 15 ऑक्टोबर 2015 तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-2015/प्र.क्र.41/अर्थ-1 दिनांक 02 जून 2015 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा परिषद परभणी अंतर्गत आस्थापनेवरील गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज http://exams.chanakyasoft.in/zpparbhani या संकेतस्थळावर मागविण्यात येत आहेत. Online अर्ज भरण्याचा कालावधी शासकीय सुटीचे दिवस धरुन दिनांक 2.11.2015 ते 16.11.2015 ( सायंकाळी 17.45) पर्यत राहील. अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरताना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती भरावी. तसेच ऑनलाईन अर्जासोबत कोणतीही प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे जोडू नयेत (Upload) करु नयेत. ऑनलाईन अर्ज करताना आपल्या सर्व शैक्षणिक व इतर बाबींची पूर्ण माहिती नमूद करावी. अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन करावे. विहित मुदतीनंतर ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया बंद करण्यात येईल. उमेदवारांनी प्रत्यक्ष ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी पदाबाबतची विस्तृत जाहिरातीचे वाचन करुन त्यातील अटी व शर्ती पडताळणी करुनच ऑनलाईन अर्ज भरावा.

गट-क मधील पदांसाठी उमेदवारांची निवड जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समिती मार्फत केली जाईल व गट ड मधील पदांसाठी उमेदवारांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समिती मार्फत केली जाईल. सदरील संपुर्ण जाहिरात http://exams.chanakyasoft.in/zpparbhani या संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषदेच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

### - रिक्त पदांची समांतर आरक्षणासह माहिती-

| अक्र | पदाचे नाव | एकुण रिक्त पदांची संख्या | अ.जा | अ.ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | औषध निर्माण अधिकारी | 02 पैकी 01 अपंग OL-BL (चलन वलन विषयक विकलांगता) | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 01 |
| 2 | आरोग्य सेवक (पुरुष) 50% | 04 | 00 | 01 | 01 | 01 | 00 | 00 | 00 | 01 | 00 |
| 3 | आरोग्य सेवक (महिला) | 23 पैकी 01 अपंग OL (चलन वलन विषयक विकलांगता) | 05 पैकी माजी सैनिक 01, अंशकालीन 01 | 02 | 00 | 00 | 00 | 02 | 00 | 04 पैकी माजी सैनिक 01 | 10 पैकी मा.सैनिक 02 अंशकालीन 01 प्रकल्पग्रस्त 01, भुकंपग्रस्त 01, खेळाडु 01 |
| 4 | कंत्राटी ग्रामसेवक | 19 पैकी 01 अपंग (HH) (श्रवण शक्तीतील दोष) | 00 | 03 पैकी महिला 01, माजी सैनिक 01 | 01 | 01 | 02 पैकी महिला 01 | 00 | 01 | 08 पैकी अंशकालीन 01 महिला 02 माजी सैनिक 01 | 03 पैकी मा.सैनिक 01 महिला 01 |
| 5 | पशुधन पर्यवेक्षक | 04 | 00 | 00 | 01 | 00 | 01 | 00 | 00 | 00 | 02 पैकी 01 महिला |
| 6 | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 00 | 00 | 00 |

| अक्र | पदाचे नाव | एकुण रिक्त पदांची संख्या | अ.जा | अ.ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | परिचर | 19 पैकी 01 अपंग (HH) (श्रवण शक्तीतील दोष) | 02 पैकी महिला 01 | 02 पैकी महिला 01 | 01 | 00 | 02 पैकी महिला 01 | 00 | 00 | 05 पैकी महिला 01 माजी सैनिक 01 | 07 पैकी महिला 02 मा.सैनिक 01 खेळाडू 01 प्रकल्प 01 ग्रस्त |
| 8 | कृषि अधिकारी , वर्ग-3 (विशेष तांत्रिक अधिकारी मग्रारोहयो ) | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 |
| 9 | कनिष्ठ अभियंता /शाखा अभियंता वर्ग-3 (विशेष तांत्रिक अधिकारी मग्रारोहयो ) | 02 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 02 |

**टिपः- 1)**उपरोक्त अनुक्रमाक 8 व 9 वरील नमूद पदे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय क्र.आस्थाप/2015/प्र.क्र.88/मग्रारो-3 दिनांक 24 जुलै 2015 नुसार अस्थायी स्वरुपाची तदर्थ तत्वावर (Adhoc Basis) प्रथमत: दोन वर्षासाठी दिनांक 31.7.2017 पर्यतचे नवनिर्मीत पदे असून सदरची पदे अत्यंत तात्पूरत्या स्वरुपाची असल्यामुळे या पदाचे आरक्षण, सरळसेवा/पदोन्नती प्रमाणानुसार पदसंख्येत बदल होवु शकेल. किंवा सदरील पदाची निवड प्रकीया शासनाचे आदेशानुसार कोणत्याही टप्प्यावर रद्य होवु शकेल.

सदरील पदांचे कर्तव्य व जबाबदा-या तसेच वेतन व इतर सेवा विषयक बाबी, अटी व शर्ती शासन निर्णय दिनांक 24 जुलै 2015 मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

2) सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरातीचे काळजीपुर्वक वाचन करुनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज http://exams.chanakyasoft.in/zpparbhani या संकेतस्थळावर सादर करावेत. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनाकांनंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

3) शासन परिपत्रक दिनांक 19 मार्च 2010 अन्वये अपंगासाठी आरक्षित पदाकरिता सामाजिक आरक्षण लागू नसल्यामुळे अपंग आरक्षित पदाकरिता गुणवत्तेनुसार निवड केलेले उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्या प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून समाविष्ट केले जाईल. परिणामी उपरोक्त नमूद पदामधुन त्या त्या प्रवर्गाची पदे कमी होतील.

4) माजी सैनिक व अंपग वगळता समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदासाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातून पात्र उमेदवारांमधुन गुणवत्तेने भरण्यात येतील.

5) शासन व विभागीय आयुक्तांकडून हजेरी सहाय्यक व अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून उमेदवार उपलब्ध झाल्यास तसेच इतर कारणास्तव उपरोक्त दर्शविलेली पदसंख्या कमी किंवा जास्त होऊ शकेल त्यामुळे उपरोक्त दर्शविलेल्या आरक्षणामध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हा निवड समितीस राहील. त्या बाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.

6) पदांचे एकुण संख्येमध्ये व आरक्षणामध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

7) सदर पदभरतीच्या नियम/निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यत शासन निर्णय/परिपत्रक/अधिसुचना/पत्रानुसार बदल होवु शकतो.

जाहिराती मधील नमूद पदाकरिता महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967 मधील तरतुद व त्यानुसार शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा नुसार खालील प्रमाणे आवश्यक शैक्षणिक व इतर अर्हता उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

## A. (पदांची वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता )

| अक्र | पदांचे नाव | वेतनश्रेणी (सुधारित) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 1 | औषध निर्माण अधिकारी | वेतन बॅन्ड 5200-20200 ग्रेड वेतन 2800 | मान्यता प्राप्त शाळेतून माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण आणि संविधानिक विद्यापीठाची डिप्लोमा इन डी फार्मसी पदविका उत्तीर्ण. फॉर्मसी ॲक्ट 1948 नुसार प्राधिकृत अधिका-याकडे नोंदणी केलेले नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| 2 | आरोग्य सेवक (पुरुष) 50% | वेतन बॅन्ड 5200-20200 ग्रेड वेतन 2400 | जे विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आहेत आणि राष्ट्रीय मलेरीया प्रतिरोध कार्यक्रमा अंतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून नव्वद दिवसाचा अनुभव आवश्यक.<br>(या साठी जिल्हा हिवताप अधिकारी यांचे अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. इतर उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.) |
| 3 | आरोग्य सेविका (महिला ) | वेतन बॅन्ड 5200-20200 ग्रेड वेतन 2400 | ज्यांची अर्हता प्राप्त साहयकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणी साठी जे पात्र असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| 4 | कंत्राटी ग्रामसेवक | एकत्रित मानधन रु.6000/- व दरमहा रु.1100/- प्रवासभत्ता | उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान 60 टक्के गुणांसह उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी बी.एस.डबल्यू) आणि संगणक हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील किंवा कृषि पदविका (दोन वर्षाचा अभ्यासक्रम) उत्तीर्ण व कृषि पदवीधारक (कृषि पदविका व कृषि पदविधारक याचे अर्ज मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे प्रलंबित असलेली याचिका क्रमांक 7078, 7102, 7104 व 7160/2011 च्या निर्णयाच्या अधीन राहून स्विकारण्यात येतील.) |
| 5 | पशुधन पर्यवेक्षक | वेतन बॅन्ड 5200-20200 ग्रेड वेतन 2400 | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संचालकाकडून घेण्यात येणा-या किंवा कोणत्याही वैधानिक कृषि विद्यापीठाकडून घेण्यात येणा-या पशुधन पर्यवेक्षक पाठयक्रमात उत्तीर्ण झाले असतील किंवा तांत्रिक परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य मुबंई यांचेकडून घेण्यात येणा-या दुग्धशाळा क्षेत्र व्यवस्थपनातील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील असे उमेदवार किंवा महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ नागपूर यांचे मार्फत चालविण्यात येणा-या पशुव्यवस्थापन व दुग्धउत्पादन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण, वैधानिक विद्यापीठातील पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करता येईल. |
| 6 | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | वेतन बॅन्ड 9300-34800 ग्रेड वेतन | संविधीमान्य विद्यापिठाची विज्ञान, कृषी, वाणिज्य किंवा वाङःमय शाखेची अर्थशास्त्र किंवा गणित अथवा सांख्यिकी या विषयासह प्रथम अगर द्वितीय वर्गातील पदवी धारण करीत असतील किंवा ज्यांना नमुना सर्वेक्षणाचा अनुभव असेल किंवा पदवी व अनुभव दोन्ही असतील अशा उमेदवारामधुन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4200 | नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल, परंतु उक्त विषयापैकी एका विषयाची स्नातकोत्तर पदवी धारण करणा-या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| 7 | जिल्हा सेवा (वर्ग-4) परिचर | वेतन बॅन्ड 4440-7440 ग्रेड वेतन 1300 | मान्यता प्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी ईयत्ता चौथी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारा मधुन नामनिर्देशनाने करण्यात येईल. |
| 8 | कृषि अधिकारी , वर्ग-3 (विशेष तांत्रिक अधिकारी मग्रारोहयो ) | वेतन बॅन्ड 9300-34800 ग्रेड वेतन 4400 | कृषि विषयातील स्नात्तकोत्तर पदवी किमान दुस-या श्रेणीत उत्तीर्ण केली असेल किंवा संविधानिक विद्यापीठातून कृषि विषयक पदवी पहिल्या वर्गात प्राप्त केली असेल किंवा कोणत्याही इतर समतुल्य अर्हता धारण केली असेल तसेच कृषि कामाची उच्चशैक्षणिक अर्हता व कृषि कामाचा अनुभव प्राप्त केला असेल किंवा सुधारित कृषिचा ग्रामीण जीवन वा प्रत्यक्ष अनुभव असेल त्यांना प्राधान्य देण्यात येईल. |
| 9 | कनिष्ठ अभियंता /शाखा अभियंता वर्ग-3 (विशेष तांत्रिक अधिकारी मग्रारोहयो ) | वेतन बॅन्ड 9300-34800 ग्रेड वेतन 4300 | स्थापत्य अभियात्रिकी या विषयातील मान्यता प्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा समतुल्य अर्हता. |

## B) वयोमर्यादा (ऑनलाईन अर्ज स्विकारणेच्या शेवटच्या दिवशी )

1.उमेदवाराचे वय अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास 18 वर्षापेक्षा कमी नसावे आणि खुल्या प्रवर्गासाठी 33 वर्षे व मागासवर्गीयांसाठी 38 वर्षापेक्षा जास्त नसावे.

**कमाल वयोमर्यादा पुढील प्रकरणी शिथिलक्षम असेल.**

2.आरोग्य सेवक (पुरुष) 50% पदाकरिता शा.नि. दिनांक 21.10.2014 नुसार 45 वर्षापर्यंत शिथिल.

3 आरोग्य सेवक (महिला) पदाकरिता वयोमर्यादा कमाल 40 वर्षापर्यंत शिथिल राहील.

4.अपंग, प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी 45 वर्षापर्यंत वयोमर्यादा राहील.

5.माजी सैनिकासाठी शासन सेवेतील वर्ग 3 व वर्ग 4 मधील पदांसाठी नेमणूकी करिता विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधीक 3 वर्षे इतका राहील. तसेच अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग 3 वर्ग 4 मधील पदांसाठी नेमणूकीकरिता कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील.

6.स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यत राहील.

7.शासन निर्णय दिंनाक 27 ऑक्टोबर 2009 नुसार सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य योजने अंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये तीन वर्ष व अंशकालीन काम केलेल्या व रोजगार व मार्गदर्शन केंद्रांमध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा 46 वर्ष राहील.

8.सन 1991 चे जनगणना कर्मचारी व सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवारांना कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यत राहील.

9.शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासन निर्णय दिनांक 30.4.2005 नुसार अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता लक्षात घेवुन वयोमर्यादा 5 वर्षे शिथिलक्षम राहिल.

10.आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत असलेल्या कर्मचा-यांचे बाबत कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील.(नियुक्ती प्राधिका- यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.)

## C )संगणक अर्हता-

**1.** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशासन 2000/प्र.क्र.5/2001/32 दिनांक 20/7/2002 अनुषंगिक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांपैकी परिचर पदाव्यतिरिक्त अन्य पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी /वापराबाबतचे खाली नमूद केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनाकांपासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

**2**) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर, C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

**3**) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र तसेच महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभाग शा.नि.क्रमांतंस2012/प्र.क.277/39 दि.4 फेब्रवारी 2013 चे परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेले संगणक विषयी एकुण 86 कोर्सच्या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र अर्हताधारक पात्र असतील.

**4**) कंत्राटी ग्रामसेवक पदाकरिता संगणक अर्हता अनिवार्य राहील.

## D ) लेखी परीक्षेचे स्वरुप व प्रश्नपत्रिकेचा दर्जा-

अर्ज छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची (Objective Type) असेल. सदर परीक्षा ही पदासाठी आवश्यक असलेल्या किमान अर्हता, सामान्य ज्ञान व पदासाठी आवश्यक असणा-या ज्ञानावर आधारित राहील. लेखी परीक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे असेल.

| अ क्र | संवर्ग | मराठी संबंधित गुण | | इंग्रजी संबंधित गुण | | सामान्य ज्ञान संबंधित गुण | | बुध्दिमान व गणित संबंधित गुण | | तांत्रिक संबंधित गुण | | एकुण गुण | | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | |
| 1 | औषध निर्माण अधिकारी | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | सर्व विषय एस.एस.सी दर्जाची परीक्षा व औषध शास्त्र संबंधी प्रश्न |
| 2 | आरोग्य सेवक (पुरुष) | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | एस.एस.सी दर्जाची परीक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| 3 | आरोग्य सेविका ( महिला ) | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | एस.एस.सी दर्जाची परीक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| 4 | कंत्राटी ग्रामसेवक | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | सर्व विषय एच.एस.सी दर्जाची परीक्षा व कृषि पदविका दर्जाचे प्रश्न |
| 5 | पशुधन पर्यवेक्षक | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | मराठी 12 वी दर्जा, विज्ञान व आरोग्य संबंधी प्रश्न पदविका दर्जाची परीक्षा |
| 6 | विस्तार अधिकारी (सा) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 00 | 00 | 100 | 200 | मराठी 12 वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परीक्षा |
| 7 | जिल्हा सेवा (वर्ग-4) परिचर | 20 | 40 | 00 | 00 | 20 | 40 | 10 | 20 | 00 | 00 | 50 | 100 | इयत्ता 4 थी दर्जा |
| 8 | कृषि अधिकारी , वर्ग-3 (विशेष तांत्रिक अधिकारी मग्रारोहयो) | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | मराठी 12 वी दर्जा, कृषि संबंधी प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | कनिष्ठ अभियंता /शाखा अभियंता वर्ग-3 (विशेष तांत्रिक अधिकारी मग्रारोहयो ) | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 40 | 80 | 100 | 200 | सर्व विषय एस.एस.दर्जा व अभियांत्रिकी पदविका दर्जाची परीक्षा |

## E) पदनिहाय सदस्य सचिव यांचा तपशील व लेखी परीक्षेचे वेळापत्रक-

| अ.क्र | पदाचे नाव | संबंधीत सदस्य सचिवाचे पदनाम | लेखी परीक्षेचा दिनांक व वार | परीक्षेची वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | कृषि अधिकारी (वि.तां.अ.मग्रारोहयो) | कृषि विकास अधिकारी, जि.प.परभणी | 25.11.2015 (बुधवार) | स.10.00 ते 11.30 |
| 2 | औषध निर्माता | जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.परभणी | 25.11.2015 (बुधवार) | स.10.00 ते 11.30 |
| 3 | आरोग्य सेवक (पुरुष) | जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.परभणी | 25.11.2015 (बुधवार) | दु.2.00 ते 3.30 |
| 4 | आरोग्य सेविका ( महिला ) | जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.परभणी | 25.11.2015 (बुधवार) | दु.2.00 ते 3.30 |
| 5 | पशुधन पर्यवेक्षक | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.परभणी | 28.11.2015 (शनिवार) | स.10.00 ते 11.30 |
| 6 | कनिष्ठ अभियंता (वि.तां.अ.मग्रारोहयो) | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जि.प.परभणी | 28.11.2015 (शनिवार) | स.10.00 ते 11.30 |
| 7 | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जि.प.परभणी | 29.11.2015 (रविवार) | स.10.00 ते 11.30 |
| 8 | जिल्हा सेवा (वर्ग-4) परिचर | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जि.प.परभणी | 29.11.2015 (रविवार) | दु.2.00 ते 3.30 |
| 9 | कंत्राटी ग्रामसेवक | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जि.प.परभणी | 02.12.2015 (बुधवार) | स.10.00 ते 11.30 |

## F) परीक्षा शुल्क :-

| तपशील | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|
| सर्व पदाकरिता परीक्षा शुल्क | रु.300/- (रु.तिनशे) | रु.150/- (रु.ऐकशे पन्नास) | माजी सैनिक उमेदवारांकरिता परीक्षा शुल्क/आवेदनपत्र शुल्क लागू नाही. |

## G) ऑनलाईन अर्ज स्विकृती व शुल्क भरण्याचे वेळापत्रक

| अक्र | बाब | दिनांक पासून | दिनांक पर्यत | ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्व पदाकरिता ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | 2.11.2015 | 16.11.2015 | 19.11.2015 |
| 2 | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या शाखामध्ये शुल्क स्विकृतीचा कालावधी | 2.11.2015 | 17.11.2015 | |
| 3 | ज्यांचे अर्ज दिनांक 16.11.2015 रोजी दाखल झाले आहेत व ज्या उमेदवारांनी बॅकेमध्ये दिनांक 17.11.2015 पर्यत परीक्षा शुल्क जमा केले असेल त्यांचेसाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | 17.11.2015 | | |

## -ऑनलाईन अर्ज करावयाची पध्दत-

**1**.ऑनलाईन अर्ज http://exams.chanakyasoft.in/zpparbhani या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानुसार सदरच्या संकेतस्थळावर लॉगीन करुन दिलेल्या सुचनाप्रमाणे आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावेत अथवा त्या बाबत काही मदतीची आवश्यकता असल्यास Chanakya software services Pvt.Ltd Pune च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधावा. सदरच्या अधिकृत केंद्राचा ई-मेल आयडी zpparbhani2015@gmail.com वर किंवा 8805004257 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**2**.माहिती भरल्यानंतर अर्जाची Print काढून घ्यावी ती आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत Print काढून जिल्हा परिषद परभणी किंवा Chanakya software services Pvt.Ltd Pune यांना पाठविण्याची आवश्यकता नाही. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र परीक्षेपूर्वी तुमच्या लॉगीनमध्ये व वेबसाईटवर उपलब्ध राहिल. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**3**.पदासाठी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परीक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परीक्षेची रुपरेषा , वेळापत्रक , परीक्षा केंद्र , बैठक क्रमांक , इत्यादी बाबतची माहिती http://exams.chanakyasoft.in/zpparbhani या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करुन दिली जाईल. यासाठी उेदवारांनी नियमितपणे सदर वेबसाईट पहावी.

**4**.जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र , परभणी या कार्यालयात व आदिवासी विकास विभागाकडे नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. नांव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.

**5**.उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वीत असलेला अचुक भ्रमणध्वनी (Mobile Cell Phone) क्रमांक व ई-मेल आय.डी नमुद करावा जेणेकरुन उमेदवारास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

**6**.ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क अदा केले आहे व संपुर्ण माहिती भरुन प्रींट काढली आहे तसेच जे उमदेवार पदाच्या पात्रतेनुसार पात्र ठरले आहेत त्यांना दिनांक 19.11.2015 पासुन लेखी परीक्षेचे परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket/Admit Card) त्याच्या लॉगीन आयडी वरुन किंवा http://exams.chanakyasoft.in/zpparbhani या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल.

**7**.परीक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशीरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना परीक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही.तसेच उमेदवारांनी स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना , पॅन कार्ड , निवडणुक आयोगाचे ओळखपत्र इत्यादी सोबत आणणे आवश्यक आहे.

**8**.शासन ग्राम विकास विभाग यांचे परिपत्रक दिनांक 21 एप्रील 2015 मधील निर्देशानुसार ज्या दिवशी लेखी परीक्षा होईल त्याचे दुसरे दिवशी उत्तरतालिका (Answer Key) http://exams.chanakyasoft.in/zpparbhani या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उत्तरतालिका प्रसिध्द केलेल्या दिनांकापासुन उमेदवारांना 3 दिवसात हरकती असल्यास हरकती सबंधीत सदस्य सचिवांकडे लेखी स्वरुपात किंवा zpparbhani2015@gmail.com या ई-मेल आयडीवर सादर करता येतील. प्राप्त हरकतीची तपासणी करुन अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात येईल आणि गुणवत्ता यादीनुसार कागदपत्र पडताळणी करीता पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करुन परीक्षेचा अंतिम निकाल आठ दिवसात प्रसिध्द करण्यात येईल.

**9**. लेखी परीक्षेचा निकाल http://exams.chanakyasoft.in/zpparbhani या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**10**.पदांची उपलब्ध संख्या , समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परीक्षेत गुणत्तेच्या आधारे कागदपत्रे पडताळणी करीता निवड केलेल्या उमेदवारांची यादी http://exams.chanakyasoft.in/zpparbhani च्या संकेतस्थळावर व जिल्हा परिषदेच्या नोटिस बोर्डावर लावण्यात येईल. उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर निवड यादी याच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**11**.उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचण उदभवल्यास 8805004257 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**12**.महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील 4 मधील तरतूदीनुसार तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 26.8.2005 नुसार लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र नमुना-अ मध्ये सादर करणे आवश्यक राहिल.

**13**.आवेदनपत्र शुल्क रोखीने स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) या बँकेच्या कोणत्याही शाखेत संगणकीय चलनाद्वारे भरावे किंवा Chanakya software services Pvt.Ltd Pune यांचे गेट वे पध्दतीने एटीएम कार्ड , डेबीट कार्ड अथवा

Online Banking द्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. या करीता http://exams.chanakyasoft.in/zpparbhani या संकेतस्थळावर लॉगीन आयडी टाकल्यानंतर स्टेट बँक खाते क्रमांक चलनासह पैसे भरणे बाबतची Link Online Payment मार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

## सर्व पदाकरीता समान सुचना

**1**.राष्ट्रीयत्व भारतीय असणे आवश्यक आहे.

**2**.उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा (डोमासाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल.

**3**.प्रत्यक्ष ऑनलाईन अर्ज भरण्यापुर्वी पदाबाबतची विस्तृत जाहिरातीचे वाचन करुन त्यातील अटी व शर्ती पडताळून ऑनलाईन अर्ज भरावा. पदासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता व इतर अटी पूर्ण करीत असतील तरच ऑनलाईन अर्ज भरावा.

**4**.उमेदवारास ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्यापदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता , अनुभव , वयाच्या सवलतीसाठी व सामाजिक/समांतर आरक्षणाचा लाभ घेणेसाठी आवश्यक प्रमाणपत्र /दाखले सदर ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केलेले असावे.

**5**.पदांसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. कार्यालयात प्रत्यक्ष स्वरुपात कोणतेही अर्ज स्विकारले जाणार नाहीत . तसेच टपालद्वारे प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

**6**.उमेदवार एक पेक्षा अधिक पदासाठी अर्ज करणेस इच्छुक असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

**7**.ज्या पदांचा लेखी परीक्षा एकाच दिवशी व एकाच वेळी आहेत अशा पदांबाबत दोन्ही पदांसाठी अर्ज केल्यास सबंधित उमेदवार एका पदाच्या अपात्रतेबाबत वैयक्तीकरित्या जबाबदार राहिल.

**8**.शासन परिपत्रक दिनांक 5 जुन 2006 नुसार अनु.जाती व अनु.जमाती वगळता इतर प्रवर्गातील उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलियर) सन 2015-16 पंर्यत चालू असलेले सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र धारण करणे बंधनकारक राहिल.

**9**.महिलांच्या आरक्षणाबाबत महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय दिनांक 25 मे 2001 मधील तरतुदीनुसार नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्र (सन 2015-16) धारण करणे आवश्यक राहिल.

**10**.उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 मधील 4 नुसार तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 26.8.2005 नुसार लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञा नमुना-अ मध्ये सादर करणे अनिवार्य आहे. अर्ज भरताना माहिती सोबत सदर प्रमाणपत्र नमुद केले आहे. उमेदवाराने सदर प्रमाणपत्रात स्वत:ची खरी माहिती भरावयाची आहे. पद भरती प्रक्रियेत निवड झालेल्या उमेदवारांकडुन कागदपत्रे तपासणीच्या वेळी सदर प्रमाणपत्र साक्षांकित करुन घेण्यात येईल.

**11**.पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी आरक्षित पदाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारानी सुशिक्षित बेराजगारांना अर्थसहाय्य या योजनेतंर्गत शासकीय कार्यालयात किमान 3 वर्षापंर्यत दरमहा मानधनावर काम केल्याबदल सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याचा पुरावा प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक आहे.

**12**.अपंगाचे आरक्षण शासन निर्णय दिनांक 6 जानेवारी 2004 , शासन परिपत्रक दिनांक 6 मे 2004 व शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय दिनांक 14 जानेवारी 2011 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार राहील. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार अपंग उमेदवारांची निवड करण्यात येईल. शासन निर्णय दिनांक 29.11.2007 नुसार अपंग प्रवर्गासाठी किमान 40 % अपंगत्व असल्याबाबत मा.जिल्हा शल्यचिकित्सक किंवा तज्ञ वैद्यकीय मंडळाने दिलेले प्रमाणपत्र प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे बंधनकारक आहे.

**13**. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे परिपत्रक दिनांक 14 जानेवारी 2011 व सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक दिनांक 18 एप्रिल 2013 अन्वये अपंग उमेदवारांना सेवेत नियुक्ती देण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळामार्फत तपासणी केल्यानंतर नियुक्ती देण्यात येईल.

**14**.अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी असलेल आरक्षण शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.रक्रिधो-2002प्र.क्र.68/कियुसे-2 दिनांक 30 एप्रिल 2005 व दिनांक 18 नोव्हेंबर 2006 मधील तरतूदीनुसार राहील. सदर आरक्षणाचा लाभ घेवु इच्छिणा-या उमेदवारांबाबत शासन निर्णय दिनांक 30 एप्रिल 2005 च्या परिशिष्ट अ मध्ये दर्शविण्यात

आलेल्या राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता प्राप्त क्रिडा स्पर्धत वैयक्तिक/सांघिक स्पर्धेत प्रथम/द्वितीय /तृतीय क्रमांकाचे किंवा सुवर्ण पदक/रौप्य पदक/कास्य पदक यापैकी पदक मिळाल्याबाबत प्रमाणपत्र प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे बंधनकारक आहे. खेळाविषयक अर्हतेचे प्रमाणपत्र क्रिडा संचालनालय पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात येईल व संचालनयाकडील तपासणी अहवाल प्राप्तीनंतरच संबंधीतास नियुक्ती देण्यात येईल.

**15**.प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांनी संबंधीत जिल्हयातील मा.जिल्हाधिकारी/जिल्हा पुर्नवसन अधिकारी यांच्याकडील प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**16**.शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज नियुक्ती प्राधिकारी यांचे परवानगीने भरावेत व अशा परवानगीची मुळ प्रत मुळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

**17**.सेवानियोजन कार्यालय, आदिवासी प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडील नोंदणीकृत जनगणना अंशकालीन कर्मचारी, माजी सैनिक कल्याण बोर्ड यांच्याकडील नोंदणीकृत उमेदवारांनाही ऑनलाईन अर्ज करणे तसच विहित केलेले लेखी परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

**18.**जिल्हा परिषद कर्मचारी म्हणून कमाल वयोमर्यादेत शिथिलतेचा लाभ घेवु इच्छिणा-या उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी नियुक्ती प्राधिका-यांचे पुर्वपरवानगीचे पत्र सादर करणे आवश्यक राहील.

**19**.नावात बदल असल्यास शासन राजपत्राची अथवा सक्षम प्राधिका-याने दिलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची साक्षकिंत प्रत प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

**20**.उमेदवारांनी त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबव आणल्यास त्यास निवड प्रक्रियतनू बाद करण्यात येईल.

**21**.परीक्षा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षणात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे अथवा रद्य करणे, परीक्षेचे वेळेत अंशतः बदल करणे इत्यादी बाबतचे सर्व अधिकार शासन/जिल्हा निवड समितीस /नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

**22**.शासन निर्णय क्र.बीसीसी2011/प्रक्र/1064/2011, 16-ब दिनांक 12 डिसेंबर 2011 अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर झाली आहे अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनाकांपासून 6 महिन्याच्या आत आपले जात प्रमाणपत्राची वैधता संबधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. उपरोक्त उमेदवार यांना जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून नियुक्ती देणेत येणार असल्याने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणीचा प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समिति कार्यालयाकडे तात्काळ सादर करावयाचा असून पोहोच पावतीची साक्षकिंत प्रत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि या बाबत याचिका क्र.2136/2011 व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक 25.8.2011 रोजी दिलेल्या आदेशच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आलेली असून मा.सर्वोच्च न्यायालयाकडून प्राप्त होणा-या आदेशच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देणेत येतील.

**23**.महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक अनियो/1005/1026 सेवा-4 दिनांक 31 ऑक्टोंबर 2005 नुसार दिनांक 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण)) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

**24**.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रानिम.2007/प्रक्र.46.07/13-अ दिनांक 27.6.2008 अन्वये लेखी परीक्षेत गुणानुक्रमे गुणवत्ता यादीमध्ये अंर्तभाव करण्यासाठी उमेदवाराने एकुण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**25**. पदांची उपलब्ध संख्या, सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या किंवा समान गुण धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 5 ऑक्टोंबर 2015 च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

**अ)** वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे.

**ब)** समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनाकांस उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदयुत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात यावा.

**क**) वरील अनु.क्र.1 व 2 या दोन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाकरिता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात यावा.

**26**.शासन परिपत्रक क्रमांक पीआरई/2004/3855/प्राशि-1 दिनांक 2 जून 2005 नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नौकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तीला शासन परिपत्रकात नमूद कुंटूबातील सभासदास उपलब्ध पदावर नियुक्ती देण्याबाबत तरतूद आहे. माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील. माजी सैनिक उमेदवाराने त्यांचे अर्जा सोबत शैक्षणीक प्रमाणपत्राच्या प्रती बरोबर सैनिकी सेवेतून सेवा निवृत्त झालेल्या प्रमाणपत्राची मुळ प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

**27**.पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येतील. लेखी परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी प्रवेशपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र विहित कालावधीत स्वतः डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

**28**.सदर परीक्षेस ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करणेची आवश्यकता नसली तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरिता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी अर्ज करु नयेत.

**29**.उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व या बाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही.

**30**.उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार व कोणतीही कागदपत्रांची पुर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांना निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांचे पुर्ण छाननी नंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परीक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांने ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. कागदपत्रांची छाननी करताना उमेदवारांने ऑनलाईन भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या माहितीव्यतिरिक्त सादर केलेल्या इतर कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही. तसेच पडताळणी करताना उमेदवाराने ऑनलाईन भरलेल्या अर्जात नमूद केलेल्या बाबींचे प्रमाणपत्र/अभिलेखे/कागदपत्रे तो सादर करणेस असमर्थ ठरल्यास किंवा चुकीची प्रमाणपत्र आढळल्यास त्याला भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. आवश्यक पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार जिल्हा निवड समिती परभणी यांनी राखून ठेवले आहेत.

**31**.अपंग उमेदवारास लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरताना तसा स्पष्ट उल्लेख करावा. ज्या उमेदवारांनी अर्जात लेखनिकाची मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळी लेखनिक पुरविला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## इतर महत्त्वाच्या सुचना-

**1.**उमेदवारांची शैक्षणिक अर्हता ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनाकांस जी आहे ती अंतिम समजण्यात येईल.

**2**. जिल्हा परिषदेकडे ज्या स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य यांनी रास्त अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनी या जाहिरातीनुसार स्वतंत्र ऑनलाईन अर्ज सादर करणे बंधनकारक राहील. त्यांनी पूर्वी सादर केलेल्या रास्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**3.**ऑनलाईन अर्ज करताना आपल्या सर्व शैक्षणिक व इतर बाबींची पूर्ण माहिती नमूद करावी. भरलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर गुणवत्ता व माहितीची प्रमाणपत्रे/अभिलेखे नंतर सादर केल्यास विचारात घेतली जाणार नाहीत.

**4.**कंत्राटी ग्रामसेवकांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीवर तीन वर्षाचे कालावधीसाठी करण्यात येईल. त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांना कोणतही सुचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल. समाधानकारक काम असलेल्या उमेदवारांची तीन वर्षानंतर शासन निर्णयातील तरतूदीनुसार सेवा नियमित केली जाईल.

**5**.निवड झालेल्या कंत्राटी ग्रामसेवक उमेदवारांकडून रु.10,000/- सुरक्षा ठेव व दोन व्यक्तींचे जामीनपत्र घेण्यात येईल.

**6**.औषध निर्माण अधिकारी पदाकरिता अर्ज करणारे उमेदवारांकडे फार्मसी कॉन्सील कडील नोंदणी प्रमाणपत्र किंवा नोंदणी शुल्क भरले विषयी पावती असणे आवश्यक असून प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणीचे वेळी दाखविणे बंधनकारक आहे.

**7**.आरोग्य सेवक (पुरुष) ही पदे हंगामी फवारणी कर्मचारी यांचे 50% कोटयातील असून या करिता हंगामी फवारणी कामाचा 90 दिवसाचा अनुभवाचे जिल्हा हिवताप अधिकारी यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या

उमेदवारांनी सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्राची पडताळणी संबंधीत जिल्हा हिवताप अधिकारी यांचेकडून झाल्यानंतर नियुक्ती देण्यात येईल.

**8**.आरोग्य सेविका (महिला) पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांकडे नर्सींग कॉन्सील कडील नोंदणी प्रमाणपत्र किंवा नोंदणी शुल्क भरले विषयी पावती असणे आवश्यक असुन प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणीचे वेळी दाखविणे बंधनकारक आहे.

**9**.परीक्षा केंद्रावर भ्रमणध्वनी, गणकयंत्र तसेच इतर आक्षेपार्ह वस्तु बाळगण्यास परवानगी राहणार नाही.

10.उमेदवाराने लेखी परीक्षेच्या वेळी स्वतःचा पॅड/पेन व काळया शाईचे बॉलपेन आणणे आवश्यक राहील.

**11**.उमेदवारास लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने यावे लागेल. यासाठी कोणताही प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

**12**.नैसर्गिक आपत्तीमुळे अगर अन्यवेळी अपरिहार्य कारणामुळे विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे अगर निवड समितीस सोयीच्या दिवशी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**13**.लेखी परिक्षेत पात्र / अपात्र उमेदवारांच्या यादया तसेच पदभरती संदर्भात आवश्यक सुचना, जाहिरातीत दिलेल्या सुचनामध्ये काही बदल असल्यास असे बदल वेळोवेळी याच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. या बाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी सदर संकेतस्थळ वेळोवेळी पाहणे आवश्यक आहे. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

**14**.निवड झालेल्या उमेदवारांची चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणी करण्यात येईल. पडताळणी अहवाल प्रतिकूल असल्यास केलेली निवड व नेमणूक रद्द होवु शकेल. निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इ.यांची पुर्तता करुन देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहीत पध्दतीनुसार करुन देणे बंधनकारक राहील.

**15**.भरती प्रक्रिये संदर्भात अंतिम निर्णय जिल्हा निवड समितीचे राहतील.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सदस्य सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| जिल्हा निवड समिती परभणी | जिल्हा निवड समिती, परभणी | जिल्हा निवड समिती, परभणी |
| तथा | तथा | तथा |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) | मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी |
| जिल्हा परिषद परभणी | जिल्हा परिषद परभणी | परभणी |